अ.शा.प.क्र. मुसचा 2012/008/का.१

**मुख्य सचिवांचे कार्यालय**

मंत्रालय, मुंबई-400 032.

दिनांक : 02 फेब्रुवारी,2012

**प्रिय श्री./श्रीमती,**

**विषय :- राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये आनापान साधना वर्ग सुरु करणेबाबत ('MITRA' उपक्रम)..**

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण 2011/296/11/माशि-3, दि.05/10/2011 नुसार, राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतून आनापान साधना वर्ग सुरु करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. आनापान/विपश्यना साधनेच्या दैनंदिन सरावामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता वाढते. स्वयंशासन वृध्दींगत होते. मनाची सतर्कता वाढून आत्मविश्वास बळकट होतो. भिती, राग, चीड, उदासिनता कमी होते व कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. अभ्यास, खेळ व अन्य अवांतर उपक्रमांमध्ये सहभाग वाढतो असे निदर्शनास आलेले आहे. विपश्यना पध्दतीचे आचरण एका सुदृढ मानसिकतेच्या पिढीच्या निर्मितीसाठी अत्यावश्यक आहे. हया सर्व बाबींचा विचार करुन, राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये आनापान वर्ग सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

2. सदर आदेशांप्रमाणे शाळांमधून 'मित्र' ( MITRA -Mind In Training for Right Awareness) उपक्रमांची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टिने राज्य, जिल्हा, तालुके व शालेय पातळीवर शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-2011/(296/11)/माशि-3, दि.27/01/2012 अन्वये समित्यांची स्थापना केली असून, जिल्हास्तरीय समिती ही मुख्य कार्यकारी अधिकारी समितीच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली आहे. जिल्हा पातळीवर जिल्हास्तरावरील शाळा तसेच, अध्यापक विद्यालयांमध्ये विपश्यना शिबिरे आयोजित करण्यासाठी महत्वाची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर सोपविलेली आहे. या करिता, ज्यांनी विपश्यना शिबिर पूर्ण केले असेल अशा जिल्हयातील शाळानिहाय शिक्षक साधकांची यादी करुन, प्रशिक्षणाचा व दरवर्षीच्या उदबोधन वर्गाचा आराखडा तयार करावा व प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजित करावे. दि.15 एप्रिल ते 15 जून या कालावधीत, विपश्यना विशेष शिबिरांचे आयोजन करावे व शैक्षणिक वर्षअखेर प्रत्येक जिल्हयातील किमान 100 शाळांना प्रत्येकी किमान दोन शिक्षक उपलब्ध होतील अशा प्रकारे नियोजन व अंमलबजावणी करावी.

3. तसेच, अध्यापक विद्यालयातील सर्व शिक्षकांना विद्यार्थ्यांबरोबर विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण करण्यास प्रवृत्त करावे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची मदत घेण्याची गरज असल्यास, त्यांची मदत घ्यावी. आनापान साधना शिबिरांचे आयोजनाचे योग्यरित्या आराखडा तयार करुन, परिणामकारक अंमलबजावणी केल्यास, आपल्या जिल्हयातील शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य व उत्साह निर्माण होऊन व्यक्तिमत्व विकास व शैक्षणिक गुणवत्ता वाढीस भरीव मदत मिळेल यात शंकाच नाही. तरी आपण याबाबतची जबाबदारी समर्थपणे पार पाडाल, अशी मला आशा आहे.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

**(रत्नाकर गायकवाड)**

**प्रति,**

**सर्व जिल्हाधिकारी**

**सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.**